सन २०१७–१८ साठी रू. २५७६८ लक्ष जमा व रू. २४१८५.७२ लक्ष खर्चाच्या सुधारित आणि २०१८–१९ साठी रू. १८१२२५.२८ लक्ष प्रस्तावित जमा व रू. १७५९७१.०० लक्षाच्या प्रस्तावित खर्चाच्या अंदाज पत्रकास कार्यकारी समितीने मंजुरीची शिफारस केली.

उपरोक्तप्रमाणे नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे सन २०१७–१८ चे सुधारित व २०१८–१९ चे अनुमानित अंदाजपत्रकास मंजुरी प्रदान केली.

तपशीलवार अदांज पत्रक जमा व खर्च सोबत संलग्न केला आहे.

# नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

## सन 2018–19 अर्थसंकल्पातील जमा–खर्चाचा थोडक्यात तपशिल

(आकडे लाखात)

| अ.क्र. | लेखाशिर्ष | मुळ अनुमान | |
|---|---|---|---|
| | सुरुवातीची शिल्लक<br>दि. 01/04/2018 | **1582.28** | |
| 1 | | जमा | खर्च |
| अ. | भांडवली | 1,56,898.00 | 1,64,450.00 |
| ब. | महसुली | 18,515.00 | 7,071.00 |
| क. | अग्रीम कर व ठेवी | 4,230.00 | 4,450.00 |
| | | **1,81,225.28** | **1,75,971.00** |
| | एकूण शिल्लक दि. 31.03.2018 | | **5,254.28** |

# नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
## सन 2018–19 अर्थसंकल्पातील एकूण जमा–खर्चाचा तपशिल

(आकडे लाखात)

| अ.क्र. | लेखाशिर्ष | मुळ अनुमान | लेखाशिर्ष | मुळ अनुमान |
|---|---|---|---|---|
| 1 | एकूण जमा | 1,81,225.28 | एकूण खर्च | 1,75,971.00 |
| | एकूण शिल्लक दि. 31.03.2018 | | 5,254.28 | |

ठराव क्रमांक: **6/02/26.03.2018**

**विषय :— स्वदेश दर्शन योजने अंतर्गत वाकी, आदासा, धापेवाडा, पारडसिंगा, छोटा ताजबाग, तेलंगखेडी, गिरड (Religious Circuit) या तिर्थक्षेत्रांच्या विकासाकरीता नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील व प्राधिकरण क्षेत्राबाहेरील तिर्थक्षेत्र विकास प्रकल्पाची कामे करण्याकरिता अनुमती प्रदान करण्याबाबत.**

केंद्रीय पर्यटन मंत्रालयाच्या स्वदेश दर्शन योजनेअंतर्गत मंजूर पर्यटन स्थळी पर्यटकांसाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात, व योजने अंतर्गत वाकी, आदासा, धापेवाडा, पारडसिंगा, नारायनपुर, छोटा ताजबाग, तेलंगखेडी, केळझर, गिरड (Religious Circuit) या तिर्थक्षेत्रांचा समावेश आहे.

या योजने अंतर्गत प्रस्ताव नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणानी राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे सादर केलेला आहे. स्वदेश दर्शन योजनेअंतर्गत मंजूरी प्राप्त होणाऱ्या वाकी, आदासा, धापेवाडा, पारडसिंगा, छोटा ताजबाग, तेलंगखेडी, गिरड येथील कामांसाठी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून नेमणूक करण्याबाबत प्रस्तावित आहे.

वरील वाकी, आदासा, धापेवाडा, पारडसिंगा, छोटा ताजबाग, तेलंगखेडी, तिर्थक्षेत्र हे नागपूर जिल्हातिल असून यापैकी आदासा, धापेवाडा, पारडसिंगा हे तिर्थक्षेत्र नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्राच्या बाहेर आहे व वाकी, छोटा ताजबाग, तेलंगखेडी हे तिर्थक्षेत्र प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात येत आहेत. त्याचप्रमाणे वर्धा जिल्हातील गिरड हे तिर्थक्षेत्र, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्य क्षेत्राबाहेरील आहेत. तरी, केंद्र शासनाच्या स्वदेश दर्शन योजने अंतर्गत नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या क्षेत्राबाहेरील तिर्थक्षेत्र विकास प्रकल्पाचे अंमलबजावणी करीता विशेष बाब म्हणून मंजूरी आवश्यक आहे.

— २२ —

स्वदेश दर्शन योजने अंतर्गत १०० टक्के शासकीय अनुदानाचे अधीन राहून वाकी, आदासा, धापेवाडा, पारडसिंगा, छोटा ताजबाग, तेलंगखेडी, गिरड (Religious Circuit) या प्राधिकरण क्षेत्रातील व प्राधिकरण क्षेत्रा बाहेरील तिर्थक्षेत्रांचा रू. ५९.३१ कोटीचा विकास प्रकल्प नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत राबविण्याचे प्रस्तावीत आहे.

उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने समितीने पुढीलप्रमाणे ठराव केला.

<u>ठराव</u>: **स्वदेश दर्शन योजने अंतर्गत १०० टक्के शासकीय अनुदानाचे अधीन राहून वाकी, आदासा, धापेवाडा, पारडसिंगा, छोटा ताजबाग, तेलंगखेडी, गिरड (Religious Circuit) या प्राधिकरण क्षेत्रातील व प्राधिकरण क्षेत्राबाहेरील तिर्थक्षेत्रांचा रू. ५९.३१ कोटीचा विकास प्रकल्प विशेष बाब म्हणून नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत राबविण्यास मंजुरी प्रदान केली. तसेच यापुढे असे कार्यक्षेत्रा बाहेरील प्रकल्पास प्राधिकरणाची वेगळयाने मंजुरीची आवश्यकता राहणार नाही, हेही स्पष्ट केले. असे प्रकल्प घेतल्यास अंमलबजावणी पुर्वी प्राधिकरणास/प्राधिकरण अध्याक्षानां अवगत करावे.**

— २३ —

ठराव क्रमांक: **7/02/26.03.2018**

विषय :— प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांकरीता (EWS) मंजूर असलेल्या प्रकल्पास शासनाचा निधी व लाभार्थ्यांकडून येणारा निधी येण्यापूर्वी झालेल्या खर्चाचे देयक नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे अदा करणे व निधी प्राप्त झाल्यानंतर समायोजित करण्याबाबत.

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत एकूण १०००० घरकुलांच्या निविदा आमंत्रित करण्यात आल्या व या निविदा निश्चित करण्यात आलेल्या आहेत यापैकी आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांकरीता एकूण ४५८४ (EWS) घरकुलांचे विस्तृत प्रकल्प अहवाल केंद्र शासनाकडून मान्यता प्राप्त झालेल्या आहेत. या प्रकल्पामध्ये एका EWS घरकुलाचे चटई क्षेत्र ३०.०० चौ.मी. पर्यंत असून यामध्ये १ बेडरूम, १ ड्राईंग रूम, १ किचन रूम, स्वच्छतागृह व बाथरूम चा समावेश आहे. या प्रकल्पाच्या इमारतीची उंची (G+4) आहे. केंद्र शासनाकडून मंजूर असलेल्या प्रकल्पांची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | मंजूर प्रकल्पाचे नावे | प्रकल्पाची किंमत डिपीआर नुसार रू. कोटी | एकूण घरकुलांची संख्या (EWS) | राज्य शासनाचा निधी रू. कोटी | केंद्र शासनाचा निधी रू. कोटी | लाभार्थ्यांकडून प्राप्त होणारी रक्कम रू. कोटी | प्रगती अहवाल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | खसरा क्र. ४३, ४४/२, मौजा वाठोडा, नागपूर केंद्र शासनाची मान्यता दिनांक २०.१२.२०१६ | ३६.२४ | ३०८ | ३.०८ | ४.६२ | २८.५४ | कार्यादेश दि. १३.१२.२०१७ रोजी कंत्राटदारास देण्यात आलेला असून एकूण ७ इमारतीपैकी ६ इमारतीचे काम प्रगतीपथावर आहे. |
| २. | खसरा क्र. ६३, मौजा तरोडी (खुर्द), ता. कामठी जि. नागपूर (केंद्र शासनाची मान्यता दिनांक २९.११.२०१७) | १६२.५१ | २३७४ | २३.७४ | ३५.६१ | १०३.१६ | कार्यादेश दिनांक १८.०१.२०१८ रोजी कंत्राटदारास देण्यात आलेला असून एकूण ६४ इमारतीपैकी ११ इमारतीचे काम |

| अ. क्र. | मंजूर प्रकल्पाचे नावे | प्रकल्पाची किंमत डिपीआर नुसार रू. कोटी | एकूण घरकुलांची संख्या (EWS) | राज्य शासनाचा निधी रू. कोटी | केंद्र शासनाचा निधी रू. कोटी | लाभार्थ्यांकडून प्राप्त होणारी रक्कम रू. कोटी | प्रगती अहवाल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | प्रगतीपथावर आहे. |
| ३. | खसरा क्र. ६२, मौजा तरोडी (खुर्द), ता. कामठी जि. नागपूर (केंद्र शासनाची मान्यता दिनांक ०८.०२.२०१८) | ६६.१३ | ९४२ | ९.४२ | १४.१३ | ४२.५८ | लवकरच कामे सुरू होणार आहे. |
| ४. | ख. क्र. १२/१–२, मौजा वांजरी, नागपूर केंद्र शासनाची मान्यता दिनांक २०.१२.२०१६ | ११६.१९ | ९६० | ९.६० | १४.४० | ९२.१९ | लवकरच कामे सुरू होणार आहे. |
| | एकूण रू कोटी | ३८१.०७ | ४५८४ | ४५.८४ | ६८.७६ | २६६.४७ | |

दिनांक ०६.११.२०१७ रोजी मंत्रालय, सभाकक्षात मुंबई येथे मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष नागपूर महानगर प्रदेश विकास यांच्या अध्यक्षतेखाली प्राधिकरणाची पहिली सभा संपन्न झाली. सदर सभेतील ठराव क्र. १६/०१/०६.११.२०१७ नुसार नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रात व नागपूर शहरात नागपूर सुधार प्रन्यासतर्फे सुरू असलेली व प्रस्तावित प्रकल्पांची विकास कामे नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाव्दारेच पुर्ण करण्यात यावी अशी मंजूरी प्रदान करण्यात आली आहे.

प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत राज्य शासनाकडून रू. १.०० लक्ष प्रति घरकुल व केंद्र शासनाकडून रू. १.५० लक्ष प्रति घरकुल अनुदान प्राप्त होणार आहे. मात्र अद्याप अनुदान प्राप्त झालेले नाही. तसेच, लाभार्थी निश्चित झालेले नसल्यामुळे लाभार्थ्यांचा हिस्सा प्राप्त झालेला नाही. योजनेतील प्रकल्पाची कामे प्रगतीपथावर असल्यामुळे कंत्राटाच्या शर्ती व अटीनुसार झालेल्या कामाचे देयक देणे आवश्यक आहे.

सदर प्रकल्पाला राज्य व केंद्र शासनाकडून अनुदान तसेच लाभार्थ्यांकडून प्राप्त होणारा हिस्सा यास काही कालावधी लागणार आहे. तथापि, अनुदानाअभावी सदर आवास योजनेच्या प्रकल्पाचे बांधकाम थांबविता येणार नाही कारण सदरहू प्रकल्पाची कामे निविदेच्या शर्ती व अटी नुसार १५ महिन्यात पूर्ण करावयाची आहे. याकरीता नागपूर महानगर प्रदेश विकास

प्राधिकरणाच्या उपलब्ध अंदाजपत्रकिय तरतुदीतून झालेल्या कामाचे देयक अंदाजे रू. २५.०० कोटी पर्यंत देणे प्रस्तावीत आहे. तसेच, निधी/अनुदान प्राप्त झाल्यानंतर झालेल्या कामाच्या खर्चाची रक्कम प्राप्त झालेल्या राज्य शासन / केंद्र शासन व लाभार्थ्यांकडून प्राप्त निधीतून समायोजित करण्यात येईल. तसेच, प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत मंजूर व प्रस्तावीत कामे याच धर्तीवर राबविण्याचे प्रस्तावित आहे.

उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने समितीने पुढीलप्रमाणे ठराव केला.

ठराव: **प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत परवडणारी घरे बांधकामाच्या प्रकल्पाला राज्य व केंद्र शासनाकडून अनुदान तसेच लाभार्थ्यांकडून प्राप्त होण्यास काही कालावधी लागणार आहे. तथापि, अनुदाना अभावी सदर आवास योजनेच्या प्रकल्पाचे बांधकाम थांबविता येणार नाही, कारण सदरहू प्रकल्पाची कामे निविदेच्या शर्ती व अटी नुसार १५ महिन्यात पूर्ण करावयाची आहे. याकरिता नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या उपलब्ध अंदाजपत्रकीय तरतुदीतून झालेल्या कामाचे देयक अंदाजे रू. २५.०० कोटी पर्यंत देण्यास मान्यता प्रदान केली. तसेच भविष्यात निधिची कमतरता असल्यास हा शासनाचा महत्वाकांक्षी कार्यक्रम असल्यामुळे नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अदांज पत्रकीय तरतुदीतुन २५ कोटी रुपयापर्यंत शासकीय निधी/ लाभार्थी वाटयातुन समायोजन करण्याच्या अटीवर वापरण्यास मान्यता प्रदान केली. निधी/अनुदान प्राप्त झाल्यानंतर झालेल्या कामाच्या खर्चाची रक्कम प्राप्त झालेल्या राज्य शासन/ केंद्र शासन व लाभार्थ्यांकडून प्राप्त निधीतून समायोजित करण्यात येईल. प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत मंजूर व प्रस्तावित कामे याच धर्तीवर राबविण्यास मंजुरी दिली.**

ठराव क्रमांक: **8/02/26.03.2018**

**विषय क्रमांक :८**

**विषय : फुटाळा तलाव येथील संगीत कारंजे, लाईट साउंड व लेझर मल्टीमिडीया शो तसेच अंबाझरी उद्यान येथील स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर आधारीत लाईट साउंड व लेझर मल्टीमिडीया प्रकल्प राबविण्याबाबत.**

फुटाळा तलाव येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे संगीत कारंजे, लेझर मल्टीमिडीया शो देखिल करावा व अंबाझरी उद्यानात स्वामी विवेकानंदांच्या जीवनावर आधारीत लाईट, साऊंड व लेझर मल्टीमिडीया शो उभारण्याचे प्रस्तावित आहे.

प्रकल्पाचा विस्तृत प्रस्ताव तयार करण्यात आला. सदर्हु प्रस्तावामध्ये पाच वर्षाकरीता कार्यान्वयन, व्यवस्थापन, संचालन, देखभाल व दुरूस्ती याचा सुध्दा समावेश आहे. प्रकल्प राबविण्याकरीता एकूण अंदाजे रू. ७५.०० कोटी खर्च अपेक्षित आहे.

सदर प्रकल्पाअंतर्गत लाईट व साउंड मल्टीमिडीया शो तयार करण्याचे प्रस्तावित असल्याने याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी व प्राप्त प्रस्तावांना मंजूरी देण्यासाठी जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती स्थापन करण्यात आली आहे. तसेच प्रकल्पातंर्गत उभारवायाच्या संगीत कारंज्यांशी निगडीत तांत्रिक प्रस्ताव व तांत्रिक बाबी यासाठी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली व विश्वेश्वरय्या राष्ट्रीय प्राद्योगिकी संस्थान, नागपूर येथील तज्ञांचा समावेश असलेली तांत्रिक समिती गठीत करण्यात आली आहे.

या कामाकरीता ऑनलाईन पध्दतीने निविदा नोटीस क्र.४७/२०१६–१७, दिनांक ०२.०१.२०१७ ला प्रथम प्रस्ताव विनंती सुचना (RFP) प्रसिध्द् करण्यात आली. यावेळी फक्त दोनच एजन्सीकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यामुळे पुन्हा दिनांक ०९.०५.२०१६ रोजी व्दितीय निविदा आमंत्रित करण्यात आल्या. यात सुध्दा दोनच प्रस्ताव प्राप्त झाल्यामुळे पुन्हा दिनांक ०७.०६.२०१७ रोजी तृतीय निविदा आमंत्रित करण्यात आल्या यामध्ये सुध्दा पूढील प्रमाणे दोनच निविदा प्राप्त झाल्या आहेत. १) Studio One Khalatkar Constructions Consortium, २) Greencare Cineyug Consortium तिसऱ्यांदा (Third Call) निविदा आमंत्रित करण्यात आल्यामूळे प्राप्त दोन्ही प्रस्तावांची तांत्रिक समितीव्दारे छाननी करण्यात आली.

— २७ —

तांत्रिक समितीच्या छाननीमध्ये Studio One Khalatkar Constructions Consortium यांचा प्रस्ताव पात्र ठरला तर Greencare Cineyug consortium यांचा प्रस्ताव अपात्र ठरला. तद्नंतर पात्र प्रस्तावाचे संकल्पना सादरीकरण सुकाणु समितीचे दिनांक ३१.०८. २०१७ व दिनांक ०९.१०.२०१७ चे बैठकीत करण्यात आले.

मा. पालकमंत्री, जिल्हा नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली विषयांकीत प्रकल्पाची दिनांक १७. ०३.२०१८ ला आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीमध्ये मा. पालकमंत्री महोदयांना प्रकल्पाची अद्यावत माहिती देण्यात आली. या कामाकरीता शासन नियमावलीनुसार तीन वेळा निविदा बोलवून सुध्दा दोनच निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी फक्त एकच निविदा प्रात्र असली तरीही त्या निविदेची आर्थिक बोली (Financial Bid) उघडून नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे प्रस्ताव उचित निर्णयार्थ सादर करण्याचे मा. पालकमंत्री महोदयांनी निर्देशित केले. (बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत संलग्न)

त्याप्रमाणे दिनांक २१.०३.२०१८ रोजी सुकाणु समितीची बैठक संपन्न झाली. बैठकीमध्ये Studio One Khalatkar Constructions Consortium यांच्या सादरीकरण प्रस्तावाचे मुल्यमापन करण्यात आले. अशाप्रकारे निविदेतील निकषानुसार तांत्रिक बोलीमध्ये Studio One Khalatkar Constructions Consortium यांची निविदा पात्र ठरली.

दिनांक २३.०३.२०१८ रोजी सुकाणु समिती व तांत्रिक समिती यांची एकत्रित बैठक बोलाविण्यात आली. यावेळी Studio One Khalatkar Constructions Consortium यांची निविदा आर्थिक बोली (Financial Bid) उघडून दोन्ही समितींच्या एकत्रित बैठकीमध्ये विचारार्थ सादर करण्यात आली. Studio One Khalatkar Constructions Consortium यांनी फुटाळा तलाव व अंबाझरी ऊद्यान येथील प्रकल्पाच्या उभारणीकरीता रू. ६४,००,००,०००/— (चौसष्ट कोटी) खर्च सादर केला आहे अणि दोन्ही जागेवरील प्रकल्पांचे ५ वर्षाकरीता कार्यान्वयन, व्यवस्थापन, देखभाल व दुरूस्ती यासाठी रू. १२,५०,२०,०२०/— (बारा कोटी पन्नास लक्ष वीस हजार वीस रूपये) असा एकूण रू. ७६,५०,२०,०२०/—( छाहात्तर कोटी पन्नास लक्ष वीस हजार वीस रूपये) खर्च सादर केलेला आहे. दोन्ही समितीने बैठकीत खालील मुद्यांवर Studio One Khalatkar Constructions Consortium यांचेकडून स्पष्टीकरण मागविण्याचे निर्देशित केले.

- All Civil work including fountain: Details of civil works including area of construction, specification etc. needs to be given with approximate rate per sq.ft.

- Details electrical system, design with all components with specification to be submitted with rate analysis.
- Specifications, quantity and models assured in the technical scrutiny document needs to be confirmed by the bidder.
- Essential spares list which will be maintained at site needs to be submitted.
- Clarification from the e-tender software agency and bidder should be sought regarding the figures of the estimated rate in the financial bid is merely the requirement of the software and has no relevance as such.

समितीच्या निर्देशानुसार वरील मुद्यांवर सात दिवसात स्पष्टीकरण सादर करण्यास Studio One Khalatkar Constructions Consortium यांना दिनांक २३.०३.२०१८ चे पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

तसेच सादर करण्यात येते की, विषयांकीत दोन्ही स्थळावरील प्रकल्प राबविण्याकरीता खालील विभागांचे नाहरकत प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

- सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर – नाहरकत प्रमाणपत्र अप्राप्त.
- महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूर – नाहरकत प्रमाणपत्र अप्राप्त.
- डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला – नाहरकत प्रमाणपत्र अप्राप्त.
- महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळ – नाहरकत प्रमाणपत्र अप्राप्त.
- महाराष्ट्र मत्स्य व्यवसाय विभाग – नाहरकत प्रमाणपत्र अप्राप्त.
- महानगरपालीका, नागपूर – नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त.
- हेरीटेज समिती – नाहरकत प्रमाणपत्र अप्राप्त.
- महारष्ट्र पर्यटन विकास महामंडळ – नाहरकत प्रमाणपत्र अप्राप्त.
- पोलीस आयुक्त, नागपूर (शहर) – नाहरकत प्रमाणपत्र अप्राप्त.
- वन विभाग – नाहरकत प्रमाणपत्र अप्राप्त.

उक्त विभागांकडून आवश्यक नाहरकत प्रमाणपत्र मिळण्यास ६ महीन्याचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. यापैकी अंबाझरी प्रकल्पास नाहरकत प्रमाणपत्र लवकर प्राप्त होण्याची शक्यता आहे. करीता कार्यारंभ आदेश दोन टप्यात देता येईल. प्रथम टप्यात अंबाझरी उद्यान येथील प्रकल्पास कार्यारंभ देणे व व्दितीय टप्यात उर्वरीत कार्यारंभ आदेश देणे.

**प्रकल्पांतर्गत उभारावयाच्या पायाभूत सुविधा :—**

उपरोक्त प्रकल्पाकरीता खालील पायाभूत सुविधा आवश्यक आहे.

- ३ मेगावॅट क्षमतेचे उपकेंद्र व उच्चदाब वाहीनी — महावितरण, नागपूर ला उपकेंद्र व उच्चदाब वाहीनी उभारणीकरीता विनंती करण्यात आली आहे.
- अंदाजे २००० क्षमतेची प्रेक्षक दिर्घा.
- १८.०० मी. डी.पी.रस्त्याचे बांधकाम.
- प्रेक्षकांकरीता वाहनतळ.
- व्यापारी संकुलाचे बांधकाम.
- टिकीट बुथ चे बांधकाम.
- प्रवेशव्दारांचे बांधकाम.
- पिण्याचे पाणी, सुलभ शौचालय उभारणे.
- रस्त्याच्या पुर्वकडे सुशोभिकरण व सौदर्यीकरण.
- तलाव स्वच्छता करणे.
- पथदिवे उभारणे.

या व्यतिरीक्त मा. ना. श्री. नितीन गडकरी, मंत्री रस्ते, परिवहन, राष्ट्रीय महामार्ग, जहाज बांधणी व नौकायन विभाग, भारत सरकार यांच्या सुचनेनुसार विद्यमान रस्त्यावरील वाहतुक वळविण्यासाठी फुटाळा तलावालगत महामेट्रोतर्फे भूमिगत रस्ता /भुयारी रस्ता (Tunnel) प्रस्तावित आहे. यासाठी आवश्यक निधी केंद्र शासनाच्या CRF (Central Road Fund) अंतर्गत प्राप्त करण्याकरीता महामेट्रो (Maha Metro Railway Corporation Limited) कडून प्रस्ताव सादर करण्यास निर्देशित करण्यात आले आहे. महामेट्रोला प्रस्ताव सादर करण्याबाबत या कार्यालयाने दिनांक २०.०३.२०१८ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

दिनांक ०६/११/२०१७ रोजी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची पहिली सभा संपन्न झाली. सदर सभेतील ठराव क्र. १६/०१/०६.११.२०१७ नुसार नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रात व नागपूर शहरात नागपूर सुधार प्रन्यासतर्फे सुरू असलेली व प्रस्तावित प्रकल्पांची कामे नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त झाल्यानंतर ती सर्व विकास कामे नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाव्दारेच पूर्ण करण्यात यावी अशी मंजूरी प्रदान करण्यात आली.

उपरोक्त बैठकीत मा. मुख्यमंत्री महोदयांनी विषयांकीत प्रकल्पाची किंमत योग्य आहे किंवा कसे या बाबत भारतीय प्रौद्योगिकी संस्थान, पवई, मुंबई यांच्याकडून अभिप्राय प्राप्त करून घ्यावा व त्यानंतरच प्रकल्प राबविण्याबाबत निर्णय घेण्यात यावा, असे सुचित केले.

मा. मुख्यमंत्री महोदयांच्या सुचनेनुसार दिनांक ०६.१२.२०१७ चे पत्रान्वये संचालक, भारतीय प्रौद्योगिकी संस्थान पवई, मुंबई यांना अभिप्राय देण्याची विनंती करण्यात आली.

भारतीय प्रौद्योगिकी संस्थान, पवई, मुंबई यांचा खालीलप्रमाणे अभिप्राय दिनांक ०९.०२.२०१८ च्या पत्रान्वये प्राप्त झालेला आहे. **(प्रत संलग्न)**

IIT, Bombay is not in a position to opine on the quality and cost of hardware components because we do not have the specifications of these components and also we are not in a position to do price discovery as per GFR (General Financial Rules)

IIT, Bombay has the relevant expertise to design projects of this nature as well as scale, in case NIT wishes to re-look at this project afresh, then IIT, Bombay may provide the design consultancy. In this case, the implementation and creative components will have to be taken up separately.

**प्रस्ताव:—**

१. **भारतीय प्रौद्योगिकी संस्थान, पवई, मुंबई यांचे दिनांक ०९.०२.२०१८ च्या पत्राच्या अनुषंगाने विचारार्थ सादर.**
२. दिनांक २३.०३.२०१८ **रोजी निविदा आर्थिक बोली उघडण्यात आल्या असून तांत्रिक व सुकाणु समितीने सुचविल्यानुसार निविदाकार** Studio One Khalatkar Constructions Consortium **यांचे कडून काही मुद्यांवर स्पष्टीकरण मागविले आहे. हे प्राप्त झाल्यानंतर निविदा स्विकृती, वाटाघाटी इत्यादी बाबत प्राधिकार देण्याबाबत निर्णय घेण्यास्तव सादर.**

**ठराव** : उपरोक्त फुटाळा तलाव येथील संगीत कारंजे, लाईट साउंड व लेझर मल्टीमिडीया शो तसेच अंबाझरी उद्यान येथील स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर आधारीत लाईट साउंड व लेझर मल्टीमिडीया शो च्या रु. ७५.०० कोटी च्या प्रकल्पास महाराष्ट्र प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम २०१६ च्या कलम १३ (१)(डी) प्रमाणे प्रशासकीय मान्यता प्रदान केली. तसेच प्रकरणात निवीदाकाराकडुन तांत्रिक बाबीची पुर्तता झाल्यानंतर वाटाघाटीचे अधिकार व निविदा स्विकृती चे अधिकार मा. प्रधान सचिव नगर विकास— १ यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समितीस दिले,

१) प्रधान सचिव नगर विकास — १, (अध्यक्ष)
२) महानगर आयुक्त नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.
३) मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर.

—३१—

ठराव क्रमांक: **9/02/26.03.2018**

विषय :— प्रारूप विकास योजना नागपूर महानगर प्रदेश घन कचरा व्यवस्थापन करण्याकरीता खाजगी कंपन्यांकडून प्रकल्प राबविण्याकरिता निविदा मागवून/ स्विस चॅलेंज पद्धतीने एजेन्सी नेमण्याची कार्यवाही करण्यास मंजुरी मिळण्याबाबत.

नागपूर महानगर क्षेत्राच्या प्रारूप विकास योजनेस शासनाने दिनांक ०५ जानेवारी २०१८ च्या अधिसूचनेनुसार मंजुरी दिलेली आहे.नागपूर महानगर क्षेत्रातील ०९ शहरी विकास केंद्र निश्चित करण्यात आले असून या केंद्रात सुमारे ५ लक्ष लोकसंख्या(सन २०११ च्या जनगणनेनुसार) समाविष्ट आहे.

विकास योजनेनुसार शहरी केंद्रातील North A मधिल मौजा नांदा येथे १.६ हे.आर., East A मधिल मौजा विहीरगांव येथे १.६ हे.आर., East B मधिल मौजा पावनगांव येथे ३.१ हे. आर., South A मधिल मौजा खसरमारी येथे १.२ हे.आर., West A मधिल मौजा सुकळी(गुपचूप) येथे २.३० हे.आर व West B मधील मौजा लावा येथे १.४४ हे.आर हया खाजगी जागा घन कचरा जमा करणे व प्रक्रीयेच्या ठिकाणी पोहचविण्यासाठी ( Collection and Transfer Stations ) आरक्षित करण्यात आल्या आहेत.

शासन निर्णय कमांक घकव्य—१००३/प्र.क्र.६७५/पापु—२२,दिनांक २६/०८/२००३ नुसार जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली स्थापन समितीने ता.हिंगणा मधिल मौजा पोही येथिल स.क्र. ८० , ८२ व लगतच्या मौजा मांडवा येथिल स.क्र. ७२ या शासकीय जागा निश्चित केल्या आहेत. या जागेचे एकूण क्षेत्र २०८.७९ हे.आर. इतके आहे त्यापैकी १०० हेक्टर जागा बफर झोनसह घन कचरा व्यवस्थपनासाठी प्रस्तावीत आहे.

सध्या नागपूर महानगर क्षेत्रातील ०९ शहरी विकास केंद्राची एकूण लोकसंख्या ५ लक्ष च्या आसपास असून २०० ग्राम प्रती व्यक्ती याप्रमाणे दररोज अंदाजे १०० मेट्रीक टन कचरा तयार होत आहे. तसेच नागपूर महानगर पालीकेच्या भांडेवाडी डंपींग यार्ड मधून ५० मेट्रीक टन

— ३२ —

आणि नागपूर महानगर क्षेत्रातील नगर परीषद/ नगर पंचायतीमध्ये तयार होत असलेला ४९ मेट्रीक टन कचरा असा एकूण १९९ मेट्रीक टन कच–यावर प्रक्रीया करावयाची आहे. त्यातील निरूपयोगी प्लास्टिक चे हायड्रोकार्बन व्युत्पाद आणि ईंधन तेल मध्ये रूपांतर करून प्रकल्प व्यवहार्य करण्याचे प्रस्तावित आहे.

अशाप्रकारच्या सुविधा पुरविणाऱ्या खाजगी कंपण्याकडून निवीदा मागवून/स्विस चॅलेंज पध्दतीने हा प्रकल्प राबविण्याकरीता मंजुरी प्रदान करण्याची विनंती आहे.

उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने समितीने पुढीलप्रमाणे ठराव केला.

ठराव : **महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम २०१६ मधील प्रकरण क्र. ४, कलम १३(घ) अन्वये प्रकल्प व परियोजना कार्यान्वित करण्याचे अधिकार प्राधिकरणास आहे. त्या अन्वये नागपूर महानगर क्षेत्रात घनकचरा व्यवस्थापन करण्याकरीता खाजगी कंपन्याकडून प्रकल्प राबविण्याकरीता निविदा मागवून स्विस चॅलेंज पद्धतीने/ निविदा मागवून एजेन्सी नेमण्याची कार्यवाही करण्यास मंजुरी दिली.**

ठराव क्रमांक: **10/02/26.03.2018**

विषय:— महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम १४२ अंतर्गत असणारे अधिकार महानगर आयुक्तांना देण्याबाबत.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १४२ प्रमाणे प्रादेशिक मंडळाच्या, नियोजन प्राधिकरणाच्या किंवा यथास्थिती विकास प्राधिकरणाच्या किंवा याबाबतीत अशा मंडळाने अथवा प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीशिवाय या अधिनियमान्वये किंवा त्याखाली तयार केलेल्या नियमान्वये शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाबद्दल कोणताही खटला भरणार नाही किंवा भरलेला खटला मागे घेता येणार नाही. मात्र दिनांक १५/४/२०१७ च्या शासन अधिसूचनेतील मुद्दा क्रमांक ६ प्रमाणे १००० चौ.मी. वरील कुठल्याही बांधकामांच्या बाबतीत प्राधिकरणाच्या परवानगीची आवश्यकता असणार नाही. हेच अधिकार १००० चौ.मी. खालील बांधकामाच्या बाबतीतही वापरण्याचे अधिकार देण्याबाबत.

उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने समितीने पुढीलप्रमाणे ठराव केला.

ठराव : महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम १४२ अंतर्गत १००० चौ.मी. खालील अनधिकृत बांधकामाच्या बाबतीत अभियोग दाखल करण्याचे अधिकार महानगर आयुक्तांना प्रदान केले.

ठराव क्रमांक: **11/02/26.03.2018**

विषय:— महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कायदा २०१७ मधील कलम ७(३) नुसार कलम २८ च्या अंमलबजावणीचे अधिकार प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम २०१७ चे कलम ७ (३) मध्ये नमूद केल्याप्रमाणे कलम २८ च्या तरतुदींना आणि प्राधिकरणाने घालून दिलेली मार्गदर्शक तत्वे किंवा दिलेले निर्देश यांना अधीन राहून, कार्यकारी समिती पुढील अधिकारांचा वापर करील आणि पुढील कर्तव्ये पार पाडील :

(एक) कर्मचारी वर्गाची नियुक्ती :

(दोन) प्राधिकरणाच्या प्रकल्पांच्या आणि परियोजनांच्या मंजुरी किंवा नामंजुरीसह अशा प्रकल्पांचे किंवा परियोजनांचे नियोजन आणि कार्यान्वयन करणे :

(तीन) प्रकल्प आणि परियोजनासाठीच्या निविदांना मंजुरी किंवा नामंजुरी देणे :

(चार) कलम १४ च्या पोट कलम (३) अन्वये, प्राधिकरणाच्या वतीने परवानगी देणे किंवा परवानगी नाकारणे :

(पाच) महानगर प्रदेश विकास निधितील अतिरिक्त पैशांची गुंतवणूक करणे :

(सहा) प्राधिकरणाच्या वतीने कोणतीही कायदेशीर कार्यवाही सुरू करणे, चालवणे आणि ती मागे घेणे :

(सात) प्राधिकरणाने वेळोवेळी कार्यकारी समितीला सोपविलेल्या अधिकारांचा (विनियम करण्याच्या अधिकाराव्यतिरिक्त) वापर करणे किंवा सोपविलेल्या कार्याचे किंवा कर्तव्यांचे पालन करणे.

उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने समितीने पुढीलप्रमाणे ठराव केला.

ठराव : **उपरोक्त विषयाबाबत प्राधिकरणाकडून विशेष मार्गदर्शक तत्वे किंवा निर्देश प्राप्त होत नाही तोपर्यंत कार्यकारी समिती यांनी प्राधिकरणाने वेगळयाने मार्गदर्शक तत्वे / निर्देश दिल्यास त्या अनुसरुन कार्यवाही करावी. उपरोक्तप्रमाणे कर्तव्यांची अमलबजावणी करण्यास मंजुरी प्रदान केली.**

ठराव क्रमांक: **12/02/26.03.2018**

विषय:— **नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम २०१६ च्या कलम ४८ नुसार विविध विनियम तयार करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाची अधिसूचना दिनांक ४ मार्च, २०१७ अन्वये नागपूर महानगर क्षेत्रासाठी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना केली आहे. नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे दैनदिन कामकाजासाठी महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम २०१६ चे कलम ४८ नुसार खालील प्रमाणे विनियम करणे आवश्यक आहे.

अ) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (बैठकीचे कामकाज चालविणे) (प्राधिकरण सभा) विनियम २०१८

आ) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (समित्यांचे बैठकीचे कामकाज चालविणे) विनियम २०१८

इ) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सदस्यांना भत्ते देण्याबाबत) विनियम २०१८

ई) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम २०१८

उ) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (वित्तीय) विनियम २०१८

उपरोक्तप्रमाणे नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे विविध विनियम (२०१८) तयार करण्यासाठी तथा या विनियमाच्या मसुदा समित्यांचे गठन करण्याचे अधिकार महानगर आयुक्तांना देण्याच्या मंजुरीस्तव सादर.

उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने समितीने पुढीलप्रमाणे ठराव केला.

ठराव : **नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम २०१६ चे कलम ४८ नुसार विविध विनियम (२०१८) तयार करण्यासाठी मसुदा समित्यांचे गठन करण्याचे अधिकार महानगर आयुक्तांना प्रदान केले. तसेच, सर्व मसुदा समित्यांच्या कार्यवाहीबाबतचा अहवाल प्राधिकरणाकडून मंजुरी प्राप्त करून शासनास सादर करण्यास मान्यता दिली.**

ठराव क्रमांक: **13/02/26.03.2018**

विषय:— महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कायदा २०१७ मधील कलम ४३ नुसार वित्तीय अधिकार मर्यादा निश्चित करण्याबाबत.

महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास कायदा २०१७ कलम ४३ नुसार अधिकारांचे प्रदान प्रपत्र (अ) प्रमाणे प्रस्तावित आहे.

प्रपत्र (अ)

| अ. क्र. | अधिकाराचे स्वरूप | अधिकार प्रदान करण्यात आलेले प्राधिकारी / प्राधिकरण (Authority) | वित्तीय मर्यादा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ५ |
| भाग—१ | मूळ बांधकामाचे व दुरूस्ती यांच्या संबंधातील प्रशासकीय मान्यता देण्याचे, व निविदा स्विकृतीचे अधिकार | निविदा स्विकृती बाबतचे अंतीम अधिकार कार्यकारी समितीला राहतील. | |
| भाग—२ | विकास योजना यांच्या संबंधातील प्रशासकीय मान्यता देण्याचा अधिकार | महानगर आयुक्त | १० कोटी पर्यंत * |
| | | अध्यक्ष कार्यकारी समिती | २५ कोटी पर्यंत * |
| | | कार्यकारी समिती | ५० कोटी पर्यंत * |
| | | महानगर प्राधिकरण | संपूर्ण |

टिप :— महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांना त्यांच्याकडे प्रत्यार्पित झालेले अधिकार त्याचे स्तरावरून त्यांचे अधिनस्त अधिकाऱ्यांना पुनश्च: प्रत्यार्पण करण्याचे अधिकार राहतील.

* अर्थसंकल्पात पुरेशी तरतुद असणे आवश्यक.

उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने समितीने पुढीलप्रमाणे ठराव केला.

ठराव : महानगर प्रदेशातील विकास प्रकल्प किंवा परियोजनांची अमंलबजावणी करण्याकरिता महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कायदा २०१७ मधील कलम ४३ नुसार महानगर आयुक्त, अध्यक्ष कार्यकारी समिती तथा कार्यकारी समिती यांना अधिकार प्रदान केले. तसेच महानगर आयुक्त त्यांना प्रत्यार्पीत केलेले अधिकार त्यांचे अधिनस्त अधिकाऱ्यांना प्रत्यार्पण करू शकतील.

ठराव क्रमांक: **14/02/26.03.2018**

विषय:— नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत हाती घेण्यात येणाऱ्या विविध विकास कामाकरीता सल्लागार म्हणून नेमणूक करण्याबाबत महानगर आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्याबाबत.

नागपूर जिल्हयात नागपूर शहराला लागून अंदाजे ३५६७ चौ.कि.मी. क्षेत्राकरीता महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम २०१६ च्या कलम ३ चे उपकलम (१) च्या प्रावधानांअंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या दिनांक ०४ मार्च, २०१७ च्या अधिसूचनेद्वारा नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे.

उपरोक्त अधिसुचनेतील कलम १३ प्राधिकरणाचे अधिकार व कार्ये पोट कलम १३ (ग) अंतर्गत "महानगर प्रदेशाच्या किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या विकासाच्या परियोजना तयार करणे" व १३ (घ) प्रकल्प व परियोजना कार्यान्वित करणे इत्यादी कामे प्राधिकरणाच्या अधिकार क्षेत्रात येत असल्याने नागपूर सुधार प्रन्यास व नागपूर महानगर क्षेत्रात विविध विकास कामे करण्याकरीता प्रकल्प सललागारची नेमणूक करण्याचे प्रस्तावित होते त्या अनुषंगाने ई निविदा सुचना क्र. ३५/२०१७–१८ अन्वये जाहीरात क्र. एस.ई./७६, दिनांक ०६/१२/२०१७ अन्वये दै. टाईम्स ऑफ इंडिया, दै. लोकमत समाचार व दै. लोकसता या वृत्तपत्रात " Expression of Interest (EOI) for "Empanelment of consultants for providing Consultancy Service for Design, Management and Monitoring of various Infrastructure Projects of NIT/NMRDA for a period of three years " या कामाकरीता जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती.

या कामाकरीता निविदा (EOI) सादर करण्याचा शेवटचा दिनांक ०५/०२/२०१८ होता या दिनांकापर्यंत नागपूर सुधार प्रन्यास व नागपूर महानगर क्षेत्रात सल्लागार नियुक्तीबाबत एकूण ५८ सल्लागाराने निविदा सादर केली आहे. सल्लागाराने सादर केलेल्या निविदा कागदपत्राची तांत्रिक पडताळणी सुरू असून प्रगती पथावर आहे. नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाअंतर्गत विविध विकासाच्या परियोजना व प्रकल्प तयार करून कार्यन्वित करण्याकरीता तांत्रिक सल्लागार नियुक्त करणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने नागपूर सुधार प्रन्यास व नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाअंतर्गत ई निविदा सूचना क्र. ३५/२०१७—१८ अन्वये दिलेल्या जाहिराती अंतर्गत प्राप्त पात्र सल्लागाराची नियुक्तीकरीता नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत हाती घेण्यात येणाऱ्या विविध विकास कामाकरीता सल्लागार म्हणून नेमणूक करण्याबाबत प्रस्ताव नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची बैठकीसमोर मंजुरीकरिता ठेवण्याबाबत व प्रस्तावाचे प्रारूप मंजुरीकरिता कृपया सादर.

उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने समितीने पुढीलप्रमाणे ठराव केला.

<u>ठराव</u> : **उपरोक्त प्रस्तावानुसार नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत हाती घेण्यात येणाऱ्या विविध विकास कामाकरिता सल्लागार म्हणून नेमणूक करण्याबाबत महानगर आयुक्त यांना अधिकार प्रदान केले.**

# पुरवणी (Addendum)

विषय. १४ पृष्ठ क्र. ३८ च्या पुढे–

नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत हाती घेण्यात येणाऱ्या विविध विकास कामाकरीता सल्लागार म्हणून नेमणूक करण्याबाबत महानगर आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक २४/०१/२०१७ च्या शासन निर्णयानूसार महत्वाच्या प्रकल्पाकरीता सल्लागार नेमण्याबाबत नागपूर सुधार प्रन्यास व नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाअंतर्गत ई निविदा सुचना क्र. ३५/२०१७–१८ अन्वये दिलेल्या जाहिराती अंतर्गत ना.सु.प्र./ना.म.प्र.वि.प्रा. ला ५८ सल्लागारांचे विविध विशेषप्राविण्य असलेल्या विविध श्रेणी करीता आवेदन प्राप्त झालेले असून श्रेणी निहाय तपशिल खालील प्रमाणे आहे.

| **Categories** | **Fiancial Sub-Categories** | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | A | B | C | D | Total |
| Public utility & residential | 19 | 4 | 12 | 7 | **42** |
| Roads & transport | 17 | 2 | 7 | 3 | **29** |
| WSS Sector | 9 | 4 | 4 | 1 | **18** |
| Tourism & Special | 14 | 2 | 4 | 4 | **24** |
| **Total** | **59** | **12** | **27** | **15** | |

- Category A – Project Cost More than INR 100 Cr.
- Category B – Project Cost More than INR 50 Cr. & less than 100 Cr.
- Category C – Project Cost More than INR 10 Cr. & less than 50 Cr.
- Category D – Project Cost less than INR 10 Cr.

या प्राप्त आवेदनाची तपासणी करण्यात आली असून यामध्ये १ सल्लागार अपात्र व १ सल्लागाराने आवश्यक असलेल्या कागदपत्राची पुर्तता केली असून उर्वरीत ५६ सल्लागाराकडून सादर केलेल्या प्रमाणपत्रा बाबत स्पष्टीकरण प्राप्त करून घेण्याची कार्यवाही प्रगती पथावर आहे.

हे प्राप्त झाल्यानंतर अतिम निवड प्रकीया महानगर आयुक्त, नामप्रविप्रा यांच्यातर्फे करण्यात येईल. व निवड झालेल्या सल्लागाराची यादी माहितीकरीता प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत ठेवण्यात येईल.

ठराव क्रमांक: **15/02/26.03.2018**

विषयः— **दि. ३१.१२.२०१५ पूर्वीची बिनामंजुरी भूखंडके/ अभिन्यास/ बांधकामे प्रशमन संरचना म्हणून घोषित करण्यासाठी अर्ज स्विकारण्याची वाढीव मुदत दिनांक ३१.१०.२०१८ पर्यंत करण्याकरिता मंजुरीबाबत.**

महाराष्ट्र शासन नगर विकास यांचे शासन निर्णय क्र. टिपीएस—१८१४/प्र.क्र. ८२/१४/नियम/ नवि—१३, दिनांक ०७/१०/२०१७ रोजीच्या अधिसूचनेनुसार "प्रशमित संरचना" घोषित करण्यासाठी अधिनियमाचे कलम १५८(१) अन्वये कलेले नियम प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यातील मुद्दा क्रमांक ९ प्रमाणे नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रासाठी जाहिरात काढून दिनांक ६/४/२०१८ पर्यत मुदत निश्चित करण्यात आली होती. मात्र सदरची मुदत अपुरा वेळ शिल्लक असल्याने ६ महिण्यासाठी म्हणजेच दिनांक ३१/१०/२०१८ पर्यंत वाढ करणे गरजेचे आहे.

उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने समितीने पुढीलप्रमाणे ठराव केला.

ठराव : **दिनांक ३१.१२.२०१५ पूर्वीची बिनामंजुरी भूखंडके/ अभिन्यास/ बांधकामे प्रशमन संरचना म्हणून घोषित करण्यासाठी अर्ज स्विकारण्याची वाढीव मुदत दिनांक ३१.१०.२०१८ पर्यंत करण्यास मंजुरी प्रदान केली.**

ठराव क्रमांक: **16/02/26.03.2018**

विषय:— **महानिर्मिती कोराडी या जागेचा वाणिज्यिक स्तरावर विकास करण्याकरीता महानिर्मिती व नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यासाठी प्रकल्पाची आर्थिक व्यवहार्यता तपासणी करीता सल्लागाराची नियुक्ती करणे व प्रकल्पाची आखणी व नियोजन करणे त्याकरीता इतर सल्लागारांची नियुक्ती करणे.**

महानिर्मिती कंपनीच्या कोराडी औष्णिक विद्यूत केंद्राची जागा मुबलक प्रमाणात असून सदर जागा वाणिज्यिक वापरासाठी विकसीत करून प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आर्थिक दुर्बल घटकांसाठी परवडणारी घरे बांधणेसाठी विकास यंत्रणा म्हणून नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण ची नियुक्ती करणे व त्यासाठी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व महानिर्मिती यांच्या सामंजस्य करार करणे, या मुद्यांचा नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण बैठकीच्या विषय सुचीमध्ये समाविष्ट करण्यासाठी वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

महानिर्मिती कोराडी या जागेचा वाणिज्यिक स्तरावर विकास करण्याकरीता नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांची विकास यंत्रणा म्हणून नेमणुक करणे व या कामाकरीता महानिर्मिती व प्राधिकरण यांच्यामध्ये सामंजस्य करार करणे आवश्यक आहे.

याकरीता प्रकल्पाची आर्थिक व्यवहार्यता तपासणी करीता सल्लागाराची नियुक्ती करून त्यानंतर इतर सल्लागारांची नियुक्ती करून प्रकल्पाची आखणी व नियोजन करावे लागणार आहे.

उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने समितीने पुढीलप्रमाणे ठराव केला.

ठराव : **महानिर्मिती कोराडी या जागेचा वाणिज्यिक स्तरावर विकास करण्याकरीता महानिर्मिती व नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यामध्ये सामंजस्य करार करणे याकरीता प्रकल्पाची आर्थिक व्यवहार्यता तपासणीसाठी सल्लागाराची नियुक्ती करून व त्यानंतर प्रकल्पाची आखणी व नियोजन करण्याकरीता इतर सल्लागारांची नियुक्ती करण्यास मंजुरी प्रदान केली.**

**याशिवाय, मा. मुख्यमंत्री यांनी पुढील प्रमाणे निर्देश दिलेत.**

- आकृतिबंध शासनाच्या मंजूरीस्तव पाठवावा. तसेच पदे भरतांना नागपूर सुधार प्रन्यास मधील कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचा ही विचार करण्यात यावा.
- स्वदेश दर्शन योजने अंतर्गत नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्राबाहेरील (गिरड — वर्धा जिल्हा) सुध्दा प्रकल्प नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत कार्यान्वित करता येतील.
- प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत १ लक्ष घरे बांधण्याचे दृष्टिने नियोजन करण्यात यावे.
    १. शासनाच्या सर्व यंत्रणानी (म्हाडा, नामपा व नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण ) मिळून नागपूर शहरा व महानगर परिसरात १ लक्ष घरे बांधण्याचे उदिष्ट ठेवावे.
    २. लाभार्थिंचे प्रमाणीकरण नागपूर महानगर पालिकाव्दारे तातडीने करण्यात यावे
    ३. प्रत्येक जागी पोच मार्ग, पाणी व विद्युत इत्यादी आवश्यक पायाभुत सुविधा राहतील अशा ठिकाणी योजना राबवावी किंवा जेथे सुविधा पुरविणे व्यवहार्य होईल अशा ठिकाणी योजना हाती घेण्यात याव्यात.
    ४.प्रधानमंत्री आवास योजनेच्या प्रस्तावीत जागांवर असलेल्या विटभट्टयांमुळे प्रकल्प बाधीत होत आहे. त्यावर मा. पालकमंत्री तथा उर्जा मंत्री श्री चद्रशेखर बावनकुळे यांनी महाजेनको मार्फत मिळणाऱ्या जागेवर विटभट्टीधारकांना कोराडी येथे स्थलांतरीत करण्याकरीता लवकरच कार्यवाही माहाजेनको मार्फत धोरण निश्चीत करून करण्यात येईल. असे सांगितले.
- घनकचरा व्यवस्थापनाचा गोवा व चेन्नई चे धर्तीवर प्रकल्प राबविण्यात यावा. यासाठी निविदा, प्रक्रिया करण्यात यावी.
- प्रस्तावित वित्तीय अधिकारांना मान्यता देण्यात आली. तथापि तातडीचे बाबींसाठी मा. मुख्यमंत्री (अध्यक्ष — प्राधिकरण) यांची मान्यता घेवून प्राधिकरणाची कार्योत्तर मंजूरी घेण्यात यावी.
- महानगर क्षेत्रा अंतर्गत इमारत बांधकाम परवाने मंजुरी करीता शासनाने विकसित केलेले B.P.M.S. (Building Plan Management System) प्रणालीच्या वापर करून यानंतर बांधकामे मंजुरीची प्रक्रिया शिघ्रगतीने करण्यात यावी. याबाबत सचिव माहिती व तंत्रज्ञान यांनी आवश्यक ते निर्देश सबंधितांना दयावेत.

— ४४ —

- M.R.S.A.C. (Maharashtra Remot Sensing Application Center) तर्फे विकास आराखडयातील आरक्षित जागेवर अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम होत असल्यास त्याकरीता M.R.S.A.C तर्फे Alert System तयार करून घेण्यात यावी. तसेच नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे दिलेल्या विकास परवानग्यांची नोंद घेण्याबाबत सुध्दा Alert System तयार करण्यात यावी.
- फुटाळा तलावाच्या बाबतीत विविध विभागाकडून आवश्यक नाहरकत प्रमाणपत्रासाठी मा. पालकमंत्री यांनी बैठक घेऊन शिघ्रगतीने निर्णय घेण्यात यावा.
- सुधार योजना व लॉजीस्टिक योजनेचे काम तत्परतेने होण्यासाठी योजनेमध्ये आवश्यक बदल करावयाचे झाल्यास महानगर आयुक्त, नामप्रविप्रा यांनी आपल्या स्तरावर करून उक्त योजना राबवाव्यात.
- (SRA) झोपडपट्टी विकास योजने अंतर्गत बांधलेल्या संकुलाकरीता रस्त्याच्याबाबतीत शासनाकडुन आदेश प्राप्त करवुन घेवुन तो १ मे पर्यंत पुर्ण करावा.
- नऊ नागरी समुहातील अभिन्यास नियीमत करण्यात येत असलेल्या अडचणीचा उहापोह मा.पालकमंत्री महोदयांनी केला, त्याबाबत निर्देश दिले की याबाबत शासनाकडुन मार्गदर्शन घेवुन हा प्रश्न सोडवावा.
- विभागीय क्रिडा संकुलाचा विकास B.O.T. पध्दतीने करण्याबाबत स्वीस चॅलेंज किंवा निविदा काढुन करण्यात यावा.
- विभागीय क्रिडा संकुलाची भिंत पुर्ण करुन घ्यावी.

(डॉ. दिपक म्हैसेकर)
सदस्य सचिव तथा महानगर आयुक्त,
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

(देवेन्द्र फडणवीस)
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष,
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण